## महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर.
## ई-निविदा सुचना क्र/मबावि/वि.अ.(सां.)/संग.प्रशि./1072/2023-2024, दिनांक 25/ 7/ 2023

महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर या कार्यालया मार्फत सन 2023-2024 या आर्थीक वर्षात खालील प्रमाणे लेखाशिर्ष निहाय प्राप्त तरतुदीतुन ग्रामीण भागातील मुली व महिलांकरीता 90% अनुदानावर संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण आयोजीत करणेस्तव MKCL मान्यता प्राप्त संस्थे कडून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व्दिबंद पध्दतीने ऑनलाईन निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नांव | लेखाशिर्ष | उपलब्ध तरतुद | प्रशिक्षण कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण देणे. | SCP-2225-E-688 सन 2023-24 | रु. 10.00 लक्ष | 2 महिने (MKCL नी ठरवुन दिल्यानुसार) | MKCL चे मान्यता प्राप्त संस्थेलाच (इंस्टीट्युट) ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता यईल. |
| 2 | | TSP-2225-E-329 सन 2023-24 | रु. 10.00 लक्ष | | |
| 3 | | 10% लाभार्थी हिस्सा | रु. 2.00 लक्ष | | |
| एकुण | | | रु. 22.00 लक्ष | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

ई-निविदा नियम, अटी व शर्ती :-

1. निविदा स्विकारणे तथा निविदा प्रपत्राची शुल्क भरणे आणि ऑनलाईन अर्ज उपलब्ध होण्याची अंतिम दिनांक 26 / 7/2023 ला सकाळी 10.00 ते 8 / 8 / 2023 ला सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत राहील.
2. निविदा दिनांक 9 / 8 / 2023 रोजी दुपारी 1.00 वाजता उपस्थित निविदाधारकाचे समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडण्याचे तारखेत / वेळेत बदल करावयाचा असल्यास त्याबाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.
3. निविदा पुर्व सभा दिनांक28/ 7/ 2023 रोजी सकाळी 11.30 वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षते खाली जनपथ सभागृह येथे घेण्यात येईल.
4. निविदेच्या अटी व शर्ती निविदा फार्म सोबत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर तसेच कार्यालयीन सुचना-फलकावर पहावयास मिळेल. निविदा द्विबंद पद्धतीने - सादर कराव्यात. आवश्यक कागदपत्रे नियम व अटी लिफापा क्रमांक 1 मध्ये व प्रशिक्षण दर (आकड्यात व अक्षरी) लिफाफा क्रमांक 2 मध्ये सादर करणे आवश्यक राहील. निविदा अर्जाची किंमत रु. 5,100/- (नापरतावा) रक्कम भरुनच ऑनलाईन निविदा भरण्यासाठी आपणांस उपलब्ध होतील.
5. निविदा फार्मची नापरतावा रक्कम (निविदा फी) रु. 5,100/- व इसारा रक्कम (EMD) रु. 85,000/- SBI Online अथवा इतर राष्ट्रीयकृत बँके मार्फत Net Banking द्वारेच भरावी. त्याशिवाय भरण्यात आलेले दर उघडण्यात येणार नाही. तसेच निविदा स्विकृती आदेशापासुन 7 दिवसाचे आंत एकुण 3% सुरक्षा ठेव रक्कम जमा न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार निविदा समितीस राखून ठेवण्यात आलेले आहेत. (निविदा फी व इसारा रक्कम ऑनलाईन भरल्याबाबतची पावती लिफापा क्रमांक 1 मध्ये अपलोड करणे आवश्यक राहील)
6. अनामत रक्कमेपासून सुट असल्यास सुट दर्शविणारे विवरणपत्र तसेच मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडे व त्या विभागाकडे नोदणी असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
7. निविदेमध्ये सहभागी निविदाकाराने कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची इसारा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल. तसेच निविदाकारावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

Scanned with CamScanner

8. संस्था अथवा दुकाने असल्यास नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. सहकारी संस्था असल्यास उपविधीची (नियमावलीची) प्रत सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संस्थामधील भागीदाराचे निविदा अर्जास अनुमोदन दिल्याबाबतचे अधिकृत स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
10. संस्था नोंदणीकृत व पंजीकृत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)
11. सदरचे अभ्यासक्रमास / प्रशिक्षणास तांत्रिक शिक्षण मंडळ / व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ / केंद्र शासन / राज्य शासन / प्राधिकरण / एमकेसीएल, इत्यादीची मान्यता असावी. (मान्यतेबाबतची कागदपत्रे जोडावी.)
12. पॅन कार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे.
13. वस्तु व सेवा कर नियम 2017 अन्वये पंजीकरण केल्यायबाबत GST नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.
14. सन, 2020-21, 2021-22 व 2022-23 या आर्थिक वर्षाचे अद्यावत अंकेक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.
15. सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (आयकर भरण्यापासुन सुट मिळाली असल्यास तद्संबंधीचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक)
16. प्रशिक्षण संस्थेचे सन 2022-23 या आर्थिक वर्षातील उलाढाल (Turn -Over) किमान रु. 15.00 लक्ष बाबतचे C.A. चे स्वाक्षरीनिशी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
17. सन 2022-23 या आर्थिक वर्षात संस्थेमार्फत MKCL चे मान्यतेने प्रशिक्षणार्थ्यांना संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण दिल्याबाबत एक वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
18. निविदा धारकास कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने तसेच महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, इतर राज्य शासन यांनी काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्याबाबत तसेच निविदा धारक यांचेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत रु. 100/- चे स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.
19. निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच निविदेत सादर केलेले सर्व दस्तऐवज व माहिती खरी असल्याबाबत रु. 100/- चे स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.
20. निविदा धारकाने निविदा उघडणे पुर्वी नमुद सर्व मुळ स्टॅम्प पेपर (Original Stamp Paper) कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय आपली निविदा उघडण्यात येणार नाही.
21. संस्थेला जिल्हास्तरावर आणि ज्या तालुक्यात प्रशिक्षण द्यावयाचे आहे, त्या तालुक्याचे नांव लिफापा क्रमांक 1 मध्ये नमुद करणे आवश्यक राहील.
22. प्रशिक्षण प्रकल्प (तालुका) व बिट स्तरावर आयोजीत करावयाचे असुन प्रशिक्षणाचे दर परिक्षा शुल्क, प्रशिक्षण साहित्य व इतर आवश्यक सुविधे सह नमुद करणे आवश्यक आहे.
23. संस्थेकडे प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षीत प्रशिक्षक वर्ग व पुरेशे प्रशिक्षण साहित्य (संगणक संच) असणे आवश्यक आहे.
24. संस्थेकडे प्रशिक्षणासाठी वर्ग खोल्या, पुरेशा प्रमाणात आवश्यक उपकरणे व इतर सोयी सुविधा असाव्यात.
25. प्रशिक्षणार्थ्यांकरीता संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षणाचे आयोजन करणेस्तव प्रशिक्षण संस्थेचे पॅनल तयार करण्यात येईल. L1 प्रशिक्षणसंस्थेच्या दरात काम करण्यास तयार असलेल्या सदर ई-निविदेतील L2 व इतर कंत्राटदारांना पॅनलमध्ये सहभागी करण्यात येईल. कामाचे वाटप करण्याचे सर्वाधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे राहतील.
26. प्रशिक्षणाची रक्कम कमी - जास्त होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षण आदेशानुसार प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. आवश्यकता भासल्यास मंजूर दराने इतर योजनेकरीता सुद्धा सदर प्रशिक्षणाचे आयोजन करावे लागेल.
27. प्रशिक्षण आदेश निधीची उपलब्धता व लाभार्थ्यांचे संख्येनुसार देण्यात येईल.
28. निविदेतील प्रशिक्षण मंजुर दर मार्च 2024 पर्यंत लागु राहतील.
29. संबंधीत प्रकल्प कार्यालय व महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना प्रशिक्षण स्थळाबाबतची माहिती अवगत करुन द्यावी लागेल.

CS Scanned with CamScanner

30. नविदा मंजूर झाल्यानंतर निवड झालेल्या संस्थेस प्रशिक्षण अमलबजावणी संदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या अथवा होणाऱ्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रशिक्षण आदेशाच्या वेळी विहीत रक्कमेच्या कोर्ट फी स्टॅम्पवर करारनामा करुन द्यावा लागेल.
31. निविदेतील नमुद तसेच प्रशिक्षण आदेशातील अटी व शर्ती नुसार विहीत कालावधीत प्रशिक्षण पुर्ण करुन देणे बंधनकारक राहील.
32. प्रशिक्षणाबाबत संस्थेला अग्रीम देय राहणार नाही.
33. प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षण शुल्कात वाढ झाल्यास कोणतेही अतिरीक्त शुल्क देय राहणार नाही.
34. संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षणार्थ्यांपैकी अनुतीर्ण तसेच गैरहजर प्रशिक्षणार्थ्यांना पुन:श्च परिक्षेला बसविण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेची राहील.
35. प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करुन बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी अहवाल कार्यालयाकडे सादर केल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
36. सुरक्षाठेव रक्कम यशस्वी प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर प्रशिक्षणा बाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त नाही याची खात्री करुन व प्रशिक्षण आदेशातील ठरवुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार सर्व दस्तऐवज कार्यालयाकडे उपलब्ध करुन दिल्यानंतरच बिनव्याजी परत करण्यात येईल.
37. उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक-भांखस-2014/प्र.क्र. 82 / भाग- III / उद्योग - 4 , दिनांक 1 डिसेंबर 2016 मध्ये नमुद सर्व अटी व शर्ती प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक राहील.
38. निविदेत अपलोड करावयाचे सर्व दस्तऐवज ओरीजनल, किंवा झेरॉक्स प्रती स्वंय साक्षांकीत करुन अपलोड करावे.
39. कोणतेही कारण न देता निविदा कोणत्याही टप्प्यावर अंशत: किंवा पुर्णत: रद्द करण्याचे अधिकार निविदा समिती जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना राहतील.
40. प्रशिक्षण प्रक्रिये बाबत काही वाद उद्भवल्यास त्या संबंधाने कायदेशिर कार्यवाहीची कक्ष जिल्हा सत्र न्यायालय, चंद्रपूर असेल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,चंदपूर.**

निविदेतील वरील सर्व नियम व अटी बाबतची या संस्थेनी जाणीव करुन घेतली असुन सदरील सर्व नियम व अटी या संस्थेस मान्य आहे.

दिनांक

निविदा धारकाची / संस्थेची सही व शिक्का

वि.अ.(सां.)
(संदीप मडावी)

क.प्र.अ.
(अजय मुसनवार)

उपमु.का.अ.(बा.क.)
(संग्राम शिंदे)

Scanned with CamScanner

## निविदा अर्ज
## लिफापा क्र.1 (तांत्रीक बाबीचा)

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

विषय :- ग्रामीण भागातील मुली व महिलांकरीता 90% अनुदानावर संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण देणे.

संदर्भ :- साप्ताहीक / दैनिक------------------------मध्ये प्रकाशित झालेली आपली निविदा सुचना दि. / /2023

महोदय,

वरील प्रकाशित झालेल्या निविदा सुचनांचे अनुषंगाने खालील माहिती आवश्यक कागदपत्रासह सादर करीत आहे.

| अ.क्र. | विवरण | आवश्यक कागदपत्र |
|---|---|---|
| 1 | निविदा धारकाचे (संस्थेचे) नांव व पत्ता लिहीणे आवश्यक आहे. | |
| 2 | संस्था अथवा दुकाने असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. | |
| 3 | सहकारी संस्था असल्यास उपविधी (नियमावलीची) प्रत सादर करणे आवश्यक राहील. | |
| 4 | संस्थेस तांत्रिक शिक्षण मंडळ/व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ/केंद्र शासन/राज्य शासन/ प्राधीकरण / एमकेसीएल इत्यादीची मान्यता असल्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. | |
| 5 | निविदा फी रु. 5,100/- (नापरतावा) व इसारा रक्कम (EMD) रु. 85,000/- SBI Online अथवा इतर राष्ट्रीयकृत बँके मार्फत Net Banking द्वारेच भरता येईल (पावती सोबत जोडावी). सुट असल्यास त्यासंबंधीचे कागदपत्रे अपलोड करावे. | |
| 6 | प्रशिक्षण संस्थेचे सन 2022-23 या आर्थिक वर्षातील उलाढाल (Turn -Over) किमान रु. 15.00 लक्ष बाबतचे C.A. चे स्वाक्षरीनिशी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | |
| 7 | सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या आर्थिक वर्षाचे अद्यावत अंकेक्षण अहवाल सादर करणे आवश्यक राहील. | |
| 8 | सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (आयकराबाबत सुट मिळाली असल्यास तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील). | |
| 9 | पॅन कार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे. | |
| 10 | वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 अन्वये पंजीकरण केल्याबाबत GST नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | |
| 11 | सन 2022-23 या आर्थिक वर्षात संस्थेमार्फत MKCL चे मान्यतेने प्रशिक्षणार्थ्यांना संगणक दुरुस्ती (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण दिल्याबाबत एक वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | |
| 12 | जिल्हास्तरावर किंवा ज्या तालुक्यात प्रशिक्षण द्यावयाचे आहे त्याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. | |
| 13 | काळ्या यादीत समाविष्ठ नसल्याबाबत रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर शपथपत्र तसेच रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर निविदेतील इतर अटी व शर्ती बाबत आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. | |

(टिप :- अपलोड करावयाचे सर्व दस्तऐवज ओरीजनल किंवा झेरॉक्स प्रती स्वंय साक्षांकीत करुन अपलोड करावे. सोबत लिफाफा क्रमांक 2 मध्ये प्रशिक्षण दर भरण्यात आलेले आहेत.)

दिनांक

**निविदा धारकाची सही व शिक्का**

Scanned with CamScanner

## लिफापा क्रमांक 2
## अटी व शर्ती

लिफापा क्र.1 मधील सर्व बाबीचा तपशिल व सोबत जोडलेल्या नियम व अटी संपूर्ण वाचुन पाहिल्या व त्या मला मान्य आहेत. तसेच सदर निविदा फी रु. 5,100/- व इसारा रक्कम (EMD) रु. 85,000/- SBI Online अथवा Other Net Banking द्वारे भरणा केलेला आहे.

दरपत्रक :-

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नांव | पुर्ण कालावधी करीता प्रशिक्षणाचे प्रति लाभार्थी दर | प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण देणे. | | 2 महिने (MKCL नी ठरवुन दिल्या नुसार) |

(अक्षरी रुपये-------------------------------------------------------)

वर नमुद दर संपुर्ण प्रशिक्षण कालावधी करीता प्रशिक्षण शुल्क, प्रशिक्षण साहित्य व इतर आवश्यक सुविधेसह प्रति प्रशिक्षणार्थी नमुद करण्यात आलेले आहेत.

(टिप :- प्रशिक्षणाचे दर ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक 24.1.2014 व शुध्दीपत्रक दिनांक 19.1.2021 अन्वये ठरवुन दिलेल्या प्रशिक्षण शुल्क मर्यादेपेक्षा तसेच MKCL नी ठरवुन दिलेल्या प्रशिक्षण शुल्क मर्यादेपेक्षा अधिक नसावे.)

दिनांक :-
स्थळ :-

**निविदा धारकाची सही व शिक्का**

CS Scanned with CamScanner

## जिल्हा परिषद, चंद्रपूर
## महिला व बाल कल्याण विभाग
### ई-निविदा सुचना क्र/मबावि/वि.अ.(सां.)/संग.प्रशि.//072/2023-2024, दिनांक 25/ 7/ 2023

महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर या कार्यालया मार्फत सन 2023-2024 या आर्थीक वर्षात ग्रामीण भागातील मुली व महिलांकरीता 90% अनुदानावर संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण आयोजीत करणेस्तव विविध लेखा शिर्ष अंतर्गत प्राप्त तरतुदीचे अनुषंगाने जिल्हास्तरीय, तालुकानिहाय तसेच बिट स्तरीय प्रशिक्षण आयोजीत करण्यास्तव MKCL चे मान्यता प्राप्त संस्थे कडून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व्दिबंद पध्दतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. निविदेच्या अटी व शर्ती, निविदा फार्म व इतर आवश्यक माहिती वर नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षण विवरण | निविदा फार्म पुरविणे व निविदा स्विकारण्याचा दिनांक | निविदा पुर्व सभा (Pre Bid Meeting) | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | संगणक (MKCL मान्यता असलेले Klic Tally Prime With GST Course) प्रशिक्षण देणे (तरतुद रु. 22.00 लक्ष) | दिनांक 26/ 7/ 2023 ला सकाळी 10.00 ते दिनांक 8 /8 / 2023 ला सायंकाळी 5.45 पर्यंत | दिनांक 28/ 7/ 2023 ला सकाळी 11.30 वा. | दिनांक 9 /8/ 2023 ला दुपारी 1.00 वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्या दिवशी. |

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,चंदपूर

वि.अ.(सां.)
(संदीप मडावी)

क.प्र.अ.
(अजय मुसनवार)

उपमु.का.अ.(बा.क.)
(संग्राम शिंदे)

CS Scanned with CamScanner